





# शिक्षक अभिप्राय नोंदवही

दिनांक :- 20/06/2025
शिक्षकाचे नाव : श्री. प्रविण दादाराव ठाकरे
विषय : भयमुक्त वातावरण निर्माण करण्याबाबत
अभिप्राय : शाळेमध्ये शिक्षकांना कोणत्याही प्रकारचा ताण किंवा भीती वाटणार नाही असे वातावरण निर्माण करण्यात आले आहे. मुख्याध्यापक व व्यवस्थापन यांच्याकडून सहकार्य मिळते.

---

दिनांक : 08/07/2025
शिक्षकाचे नाव : श्री राम उभाटे
विषय : नियोजन सुधारणा
अभिप्राय : अध्यापन नियोजन व्यवस्थित असले तरी वेळेचे व्यवस्थापन अधिक सुधारण्याची गरज आहे.

---

दिनांक : 15/09/2025
शिक्षकाचे नाव : शंतनु सुरेशराव खंडागळे
विषय : मूल्यमापन पद्धती
अभिप्राय : विद्यार्थ्यांचे मूल्यमापन विविध पद्धतीने केले जात आहे, परंतु अधिक नवकल्पना आवश्यक आहेत.

| Date<br>दिनांक | Teacher's Name, Class, Period Observation<br>शिक्षकाचे नांव, वर्ग, तासिका निरीक्षण | Supervision Notes<br>निरीक्षण शेरा | Suggestion to Teacher's<br>शिक्षकांना मार्गदर्शक सुचना | Remarks of Employees<br>शेरा | Signature of Employees Concerned<br>संबंधिताची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| 02/02/2026 | प्रविण दादाराव ठाकरे<br>वर्ग 11 वा वाणिज्य<br>विषय : चिटणिसाची कार्यपद्धती | विषय नियोजनाप्रमाणे तासीका सुरु होती. | फलक लेखन करावे | आवश्यकतेनुसार फलकलेखन करतो. | [signature] 04.02.2026. |
| 03/02/2026 | अमित प्रभाकरराव चिनेवार<br>वर्ग 12 वा वाणिज्य<br>विषय : मराठी | वर्ग नियंत्रीत आहे | खेळीमेळीच्या वातावरणात शिकवावा. | योग्य वातावरण निर्मीती करण्याचा प्रयत्न करेन. | [signature] 03/02/2026 |
| 04/02/2026 | विशाल शंकरराव वैसगडे<br>वर्ग : 11 वा बी कला<br>विषय : इंग्रजी | उत्कृष्ट अध्यापन पद्धतीचा वापर | विद्यार्थ्यांचा सहभाग असावा. | सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग घेणार. | [signature] 04/02/2026 |
| 05/02/2026 | गणेश गुलाबराव राठोड<br>वर्ग : 12 वा बी कला<br>विषय : इतिहास | पहिल्या महायुद्धाचे छान वर्णन केले. | स्पष्ट उच्चार असावे. | भाषा नियंत्रीत करणार | [signature] 5/02/2026 |
| 06/02/2026 | शंतनू सुरेशराव खंडागळे<br>वर्ग : 11 वा ए कला<br>विषय : समाजशास्त्र | समाजशास्त्राच्या मूलभूत संकल्पना प्रभावीपणे स्पष्ट केल्या | विद्यार्थ्यांना समजेल अशी भाषा वापरावी. | सामाजिक शास्त्राची भाषा वापरणार. | [signature] 06/02/2026 |
| 06/02/2026 | वंदना शंकरराव सोमवंशी<br>वर्ग : 12 वा ए कला<br>विषय : राज्यशास्त्र | 1947 नंतरच्या राजकारणाचे उत्कृष्ट स्पष्टीकरण केले. | दृकश्राव्य साधनांचा वापर करावा. | तक्ते आलेख वापरणार | [signature] 06/02/2026 |
| 06/02/2026 | सुनिलदत्त कवडूजी धनुले<br>वर्ग : 12 बी कला<br>विषय : सहकार | सहकारी शिक्षण व प्रशिक्षण संकल्पना विस्तृतपणे स्पष्ट केले. | प्रश्नपत्रीकेच्या प्रारूपात उजळणी द्यावी. | प्रश्नपत्रीकेचे वाचन व स्पष्टीकरण करणार. | [signature] 06.02.2026 |

[signature]
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya
SELOO. Dist. Wardha

अहवाल

विषय: **शाळा शिक्षकांना निर्धोक, भयमुक्त व काळजी घेणारे वातावरण तयार करते तसेच पुनरावलोकन करून शिक्षकांच्या नियोजन व मूल्यमापन यंत्रणेचा विकास करते**

शाळेमध्ये शिक्षकांना सुरक्षित, निर्धोक, भयमुक्त व प्रेरणादायी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी विविध सकारात्मक उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षकांना आपले विचार मोकळेपणाने मांडता यावेत, नवकल्पना राबविता याव्यात व अध्यापन प्रक्रियेत गुणवत्ता वाढविता यावी यासाठी शाळा व्यवस्थापनाकडून सहकार्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यात आलेले आहे.

शिक्षकांच्या कार्याची दखल घेण्यासाठी वेळोवेळी **प्रशस्ती व अभिनंदन पत्रे** देण्यात येतात. यामुळे शिक्षकांचा आत्मविश्वास वाढतो व त्यांना अधिक चांगले कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळते.

शाळेमध्ये नियमितपणे **शिक्षक सभा** (Teacher Meetings) आयोजित केल्या जातात. या सभांमध्ये अध्यापन पद्धती, अडचणी, सुधारणा उपाय, तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी चर्चा केली जाते. शिक्षकांना आपले अनुभव व सूचना मांडण्याची संधी मिळते, ज्यामुळे एकमेकांकडून शिकण्याची प्रक्रिया घडते.

तसेच शिक्षकांच्या अभिप्रायासाठी **अभिप्राय पुस्तिका** ठेवण्यात आलेली आहे. शिक्षक या पुस्तिकेद्वारे शाळेच्या कार्यपद्धतीबाबत आपले मत, सूचना व सुधारणा उपाय नोंदवतात. या अभिप्रायाच्या आधारे शाळा व्यवस्थापन आवश्यक बदल करण्याचा प्रयत्न करते.

शिक्षकांच्या दैनंदिन कामकाजाची व नियोजनाची नोंद ठेवण्यासाठी **लॉग बुक / रजिस्टर** व्यवस्थित ठेवण्यात येते. यामध्ये अध्यापन नियोजन, घेतलेले उपक्रम, तसेच मूल्यमापन प्रक्रियेची माहिती नोंदवली जाते. यामुळे शिक्षकांच्या कार्याचे नियमित पुनरावलोकन करणे सुलभ होते.

शाळा व्यवस्थापनाकडून शिक्षकांच्या **नियोजन व मूल्यमापन यंत्रणेचा विकास** करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. अध्यापन नियोजन अधिक परिणामकारक करण्यासाठी मार्गदर्शन दिले जाते तसेच मूल्यमापन प्रक्रिया पारदर्शक, न्याय्य व विद्यार्थीकेंद्रित ठेवण्यावर भर दिला जातो.

वरील सर्व उपक्रमांचे पुरावे म्हणून प्रशस्ती/अभिनंदन पत्रे, शिक्षक सभांचे फोटो, अभिप्राय पुस्तिका व लॉग बुक रजिस्टरचे छायाचित्र सादर करण्यात आलेले आहेत.